# दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई

## सेवानिवृत्त शासकीय / निमशासकीय कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याबावत.

**विभागाची आवश्यकता :-**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२७१५ / प्र. क्र. १०० / १३, दि.१७ डिसेंबर, २०१६ मध्ये नमूद तरतुदींस अनुसरुन दिव्यांग कल्याण विभाग, मित्तल टॉवर, ए विंग, ३ रा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१ येथे उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) या एका पदावर शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून एका वर्षाच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | पद | पदसंख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) | १ | अपर मुख्य सचिव, दिव्यांग कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक या पदाची कामे हाताळणे. |

**अटी व शती :-**

१) सदर नियुक्ती प्रथमतः एक वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३. दि. १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी) या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने सदर पदाकरिता वेबसाईटवरील जाहिरात पाहून ds1.dkv@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून त्यांचे अर्ज दि. २१ जानेवारी, २०२५ पर्यंत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-४०१४५१७६ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

११) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा संपुष्टात आणण्याचा अधिकार राहिल.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३. दि. १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**************

# <u>अर्जाचा नमुना</u>

## सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्तीकरण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे. |

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव:- ----------------------------------------------------------------------------

२) अर्जदाराचा पत्ता:---------------------------------------------------------------------------------

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम:- -----------------------------------------------------------------

४) भ्रमणध्वनी क्रमांक:------------------------------------------------------------------------------

५) जन्म दिनांक व वय:------------------------------------------------------------------------------

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय / नाही

७) अनुभव:------------------------------------------------------------------------------------------

८) दिव्यांग कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर दि. रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक:-**

**अर्जदाराची स्वाक्षरी**